(ISSN No.2319-3646)
साहित्य, कला आणि संस्कृतीला
वाहिलेले त्रैमासिक

भूमी

वर्ष ९ वे, अंक दुसरा
सप्टेंबर - फेब्रुवारी २०१८ (जोड अंक)

संपादक
श्रीराम गोविंद गव्हाणे

सल्लागार
डॉ.नागनाथ कोत्तापल्ले, डॉ.मधुकर वाकोडे,
डॉ.श्रीकृष्ण राऊत, शिवाजी नागनाथराव वडजे,
शिवाजी आंबुलगेकर

कार्यकारी संपादक
प्रकाश नाथ महाडिक

संपादक मंडळ
डॉ.संभाजी पाटील, शैला श्याम शृंगारे,
प्रा.माधव वाघमारे, प्रा.दत्ता बडुरे, श्रीनिवास मस्के,
राणी नेम्मानीवार, अमृत तेलंग.

जाहिरात प्रमुख
लक्ष्मण लच्छमन्ना
(९४०३०७०४०५)
पांडुरंग पुट्ठेवाड
(९६६५६८२५२८)

वर्गणीसंबंधी

आजीवन (व्यक्ती) -२०००/ (संस्था) २५००/ वार्षिक २०० रू.वर्गणीदारांनी आपली वर्गणी 'भूमी पब्लिकेशन', नांदेड खाते क्र. 60266657829 (IFSC - MAHB0000720) बँक ऑफ महाराष्ट्र श्रीनगर, अशादुल्लाबाद, नांदेड-४३१६०२ येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पूर्ण पत्ता, फोन/ई-मेल करून संपादकास कळवावे.

(खाजगी वितरणासाठी - मूल्य ५०/-)

साहित्य पाठविण्याचा पत्ताः
संपादक, 'भूमी', ३ यशनगरी, तिरूमलानगर, नांदेड-०५
संवाद 08329701138/07385653620
Email-shrigavhane@gmail.com

भूमी हे त्रैमासिक 'भूमी पब्लिकेशन' नांदेडच्या वतीने जून २०१७ पासून प्रकाशक - नीता गव्हाणे प्रकाशनाचे मुखपत्र म्हणून प्रकाशित करीत आहेत. हा अंक रुद्रायणी ऑफसेट, औरंगाबाद येथे छापून भूमी, ३, यशनगरी, तिरुमलानगर, नांदेड-०५ येथे प्रकाशित केला आहे.

(या अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतील असे नाही.)

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

अनुक्रम

लेख

१. चारुता सागर यांची कथा - डॉ. नंदकुमार मोरे

२. साहित्य आणि संस्कृती अनुबंध - प्रा. सर्जेराव रणखांब

३. लक्ष्मीकांत देशमुख यांची समस्याकेंद्री कथा - डॉ. गणेश मोहिते

कथा

१. पक्ष मेळावा - इंद्रजित घुले

ललित

१. मन : अलीबाबाची दुसरी गुहा - डॉ. यु.म.पठाण

पुस्तक परीक्षण

१. सालोसाल : वसन काढून औतावर उभ्या कवीची कविता - शेषराव मोहिते

२. होऊ दे रे आबादानी : कंठशोषाच्या कविता - डॉ.अेकनाथ पगार

३. खान्देशाच्या सामाजिक इतिहासाचा दस्तऐवज : 'खान्देशचा लाल : झुलाल' - डॉ. आशुतोष पाटील

कविता

यशवंत मनोहर, सूर्यनारायण रणसुभे, अशोक बागवे, जगदीश कदम, सदानंद देशमुख, अजय कांडर, संतोष पद्माकर पवार, एकनाथ पाटील, शिवाजी आंबुलगेकर, अनिल धाकू कांबळी, व्यंकटेश चौधरी, पी.विठ्ठल, बळी आंबुलगेकर, चंद्रकांत पोतदार, सुनील तोरणे, माधवी, विरा राठोड, इरफान शेख, पांडुरंग पुठेवाड, विशाल इंगोले.

VAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

|| लेख ||

# साहित्य आणि संस्कृती अनुबंध

-प्रा.सर्जेराव रणखांब
संवाद - ९४२२५३३६६७
Email id : sbrankhamb@gmail.com

संस्कृती बहुव्यामिश्र असते. धर्म, राजकारण, समाजरचना, अर्थकारण, विज्ञान, कलासाहित्य व शिक्षण ही संस्कृतीची प्रधान अंगे आहेत. साहित्य हे संस्कृतीचे एक अंग आहे. मराठी भाषेत संस्कृती विचाराची एक परंपरा आहेच.

**गृहितक : साहित्यनिर्मिती एक संस्कृतीमूलक विधान असते.**

संस्कृतीच्या काही निरनिराळया व्याख्या पुढीलप्रमाणे विचारात घेता येतील.

मानवाची भौतिक व मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती.

आध्यात्मिक व अधिभौतिक शक्तींना सामाजिक जीवनास उपयुक्त बनविण्याची कला म्हणजे संस्कृती.

राष्ट्रातील विद्वानांचे, ऋषींचे, धर्मज्ञांचे विचार, त्यांची ध्येय, त्यांचे मार्ग व त्यांना अनुसरून राष्ट्रात झालेला आचार यांनी संस्कृती बनते.

इंग्रजीत 'कल्चर' आणि 'सिव्हिलिझेशन' असे दोन संस्कृतिवाचक शब्द आहेत. 'सिव्हिलिझेशन' याचा अर्थ भौतिक प्रगती असा अलीकडे केला जातो. उद्योगधंदे, गिरण्या, कारखाने, शास्त्रीय शेती, वाहतुकीची साधने, सुखसोयी वाढविणारी अनेक प्रकारची यंत्रे याचा सिव्हिलिझेशनमध्ये अंतर्भाव होतो.

'कल्चर' याचा अर्थ मनोय सृष्टी असा आहे. धर्म, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, राजनीती, साहित्य, कलाविज्ञान याचा कल्चरमध्ये समावेश होतो. कल्चर व सिव्हिलिझेशन या दोन्हीचाही अंतर्भाव मराठी संस्कृती या शब्दात केलेला आहे. मानवाची भौतिक व मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती अशी सुटसुटीत व्याख्या सांगता येईल. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र संस्कृती म्हणजे काय तेही समजून घेता येईल. या भूमीत निर्माण झालेले वा रूढ झालेले धर्मशास्त्र व तत्त्वज्ञान येथील राजपुरुषांनी अवलंबिलेली राजनीती त्याचे पराक्रम, त्यांची साम्राज्य, येथे निर्माण झालेली भौतिकशास्त्रे, येथील साहित्यसृष्टी एवढ्या व्यापक अर्थाने मराठी संस्कृती या शब्दाचा अर्थ उमगत जातो.

मराठी भाषा आणि मराठी संस्कृती असे म्हणत असताना आपण आपली पृथगात्मता सिद्ध करत असतो. भारतीय संघराज्यातील महाराष्ट्र हा एक घटक आहे. गुजराथी, बंगाली, कन्नड, तमिळ, हिंदी इ. प्रमुख भाषा ह्या त्या त्या प्रदेशात बोलल्या जातात. एक प्रदेश दुसऱ्या प्रदेशापासून भाषमुळेच निराळा झाला आहे. संस्कृतीचे भिन्न प्रदेश वेगवेगळ्या राज्यात अनुभवास मिळतात. इ.स.१२०० च्या सुमारास मराठी भाषिकांची भूमी म्हणजे महाराष्ट्र हे समीकरण निश्चित झाले. मराठी भाषेची उत्पत्ती आपण इ.स.८०० ते १००० च्या सुमारास मानली आहे. 'विवेकसिंधू' हा मराठीतील पहिला ग्रंथ ११८८ साली निर्माण झाला आणि याच वेळी यादवांच्या साम्राज्याची स्थापना झाली. पुढे १०० एक वर्षात महानुभाव पंथीयांचे अनेक ग्रंथ रचले गेले

आणि १९२० च्या सुमारास ज्ञानेश्वरीची निर्मिती झाली. म्हणजे तेराव्या शतकापासून स्वतंत्र निराळी मातृभाषा यामुळे महाराष्ट्राची अस्मिता निश्चित झाली. सारांश हा की, इ.स.१२०० पासून या भूमीतील संस्कृती ही महाराष्ट्राची संस्कृती असे समीकरण दृढ होऊ लागले.

सर्व कला ह्या संस्कृतीच्या आविष्कृती असतात. साहित्य ही सुद्धा संस्कृतीची आविष्कृती आहे. मानवाच्या वाढीसाठी, समृद्धीसाठी, समाज, साहित्य आणि संस्कृतीची आवश्यकता असते. संस्कृतीशिवाय समाज संभवत नाही. सामाजिक क्रियाप्रतिक्रियेचे साहित्य हे एक सर्जनशील अंग आहे. म्हणून संस्कृतीचे विविध बंध हे साहित्यातून अभिव्यक्त होतात. सामाजिक विषय आणि आशय हे संस्कृतीचे पदर व्यक्त करीत असतात. आधुनिक साहित्य आणि आधुनिक पूर्व साहित्यातील संस्कृतीचे प्रतिबिंब आपण ठळकपणे सांगू शकतो. आधुनिक पूर्व साहित्यात संस्कृतीचे चित्रण पारमार्थिक स्वरूपाचे होते. ते ऐहिक नव्हते किंवा सामाजिक मूल्यभावाने ते चित्रण केलेले नव्हते. मराठी संतसाहित्यात सामाजिक समतेची, न्यायाची व्यक्तीच्या प्रतिष्ठेची भूमिका होती, पण ही भूमिका परमार्थप्राप्तीच्या ध्येयासाठी स्वीकारली होती.

संस्कृतीच्या परिवर्तनातून साहित्यही परिवर्तनवादी होत जाते. मध्ययुगातील संस्कृती व मध्ययुगीन साहित्य यांच्यात जसा अनुबंध आहे तसा आधुनिक संस्कृती व आधुनिक साहित्याचा अनुबंध आहेच. माणसाची माणूस म्हणून असलेली प्रतिष्ठा, त्यांचे स्वातंत्र्य व सामर्थ्य इहलोकाच्या जगण्याचे महत्त्व यासारख्या नव्या मानवतावादी जाणिवा प्रबोधनकाळात उदयास आलेल्या दिसतात. माणसांच्या लौकिक जगण्याला सुरस आणि सरस करण्यासाठी या काळात साहित्य निर्माण होऊ लागले. औद्योगिक क्रांती आणि वैज्ञानिक शोध यामुळे संस्कृतीचे विविध आयाम साहित्यकृतीतून प्रतिबिंबित होऊ लागले. झपाट्याने वैज्ञानिक प्रतिभेने निसर्गाचे रहस्य उलगडून त्याच्या प्रकाशाने मानवी जीवन उजळून टाकण्याची एक प्रचंड मोहीम सुरू केली. औद्योगिक क्रांती आणि वैज्ञानिक शोधामुळे माणसाचा माणूस म्हणून असलेला आत्मविश्वास पराकोटीला पोहोचला. त्यातून परंपरागत समाज संस्कृतीच्या परिवर्तनास सुरुवात झाली. हे समाज संस्कृतीचे परिवर्तन साहित्यातून ठळकपणे अधोरेखित झालेले दिसते.

मानसशास्त्र, समाजशास्त्र, मानवशास्त्र, राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान इ. शास्त्राच्या विकासामुळे आधुनिक समाजाच्या संस्कृतीत मोठे फेरबदल झाले. समाजाचा इतिहास परंपरा आणि त्यातील व्यक्ती समूह-संस्था-शासन यांचे परस्पर संबंधातून नव्यानव्या विचारप्रणाली पुढे आल्या. धर्मसुधारणाख सामाजिक सुधारणा, शासन सुधारणा इ. करण्यासाठी प्रचंड आंदोलने झाली. आपल्या पुरोगामी, परिवर्तनवादी साहित्यप्रवाहात त्याचे प्रतिबिंब पडलेले आहे.

आधुनिकपूर्व मराठी साहित्यात धर्माची - भक्तीची जाणीव प्रधान होती. आधुनिक साहित्यात ही जाणीव क्षीण झाली आणि त्याची जागा सामाजिक जाणिवेने घेतली हे झाले आशयाच्या बाबतीत. संस्कृतीने साहित्याचा आशयच बदलतो असे नाही तर संस्कृती साहित्याच्या घाटात, प्रवृत्तीत, विविध व्यूहात हस्तक्षेप करीत जाते. नवअभिजातवादी, स्वच्छंदतावादी, वास्तववादी, निसर्गवादी, मार्क्सवादी, अस्तित्ववादी, विद्रोहवादी, मिथकवादी असे विविध विचारबंध व आकृतीबंध संस्कृतीने जन्मास घातलेले दिसतात.

संस्कृतीचे वहन व गोडवे गाणारे साहित्य जसे संस्कृतीला विविध प्रश्न विचारून संस्कृतीतील जाचक व्यवस्थेला नाकारणारे साहित्य असते. आपल्याकडील साठोत्तरी साहित्याने मराठी संस्कृतीसमोर विविध प्रश्न उभे केलेले दिसतात. संस्कृतीतील विविध संदर्भ आदिम काळापासून मानवी मनावर प्रभाव गाजवून असतात. माणसाच्या सुखदुःखाच्या तळाशी हे संदर्भ असतात. अनेक संकेताशी ते आदिम काळापासून जखडून असतात. 'डोईचा पदर आला खांद्यावरी' याचा अनुवाद दुसऱ्या अभारतीय भाषेत केला त्याचा कितपत अर्थ लागेल. 'पदर' याचा संस्कृतिवाचक अर्थ मराठी मनात जितका परिचित आहे तितका तो इतरास भावनारही नाही आणि असणार ही नाही.

साहित्याचा व्यवहार हा संस्कृतिसापेक्ष असतो हे यावरून दिसून येईल. एकंदरीत विशिष्ट समाजाचा



ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

घटक म्हणून व्यक्ती जे जे आत्मसात करते त्या साऱ्यालाच समाजशास्त्रीय अर्थाने संस्कृती म्हटले जाते. संस्कृतीची ही कल्पना तुलनात्मक पद्धतीनेच स्पष्ट होऊ शकते. आपण अभ्यासत असलेल्या समाजाच्या समाजाच्या संस्कृतीची आपणाला ज्ञान असणाऱ्या समाजाच्या संस्कृतीशी तुलना करूनच विशिष्ट संस्कृतीचा वेगळेपणा दाखविता येणे शक्य असते.

संस्कृती म्हणजे वर्तनाचे भिन्न भिन्न रचनाबंध असतात किंवा त्या वर्तनाच्या सामाजिक संरचना असतात. संस्कृती म्हणजे विशिष्ट मानवी समाजाची एकंदर जीवनपद्धती आणि साहित्य म्हणजे भाषेच्या द्वारे व्यक्त झालेला वैशिष्ट्यपूर्ण जीवनानुभव असे मानले तर सांस्कृतिक संदर्भाशिवाय साहित्य संभवतच नाही असे म्हणता येते. मुळात कोणत्या अनुभवांना साहित्य म्हणजे याविषयीचे काही संकेत प्रत्येक समाजात असतात. ते परंपरेने चालत आलेले असतात. म्हणजे कोणत्याही समाजातील साहित्य ही कल्पनाच त्या त्या समाजाचे सांस्कृतिक अंग असते. साहित्य निर्माण करणारा साहित्यिक या परंपरेच्या चौकटीत कार्य करीत असतो. त्याच्या निर्मितीमधील प्रयोगशीलतेला, नवतेला सांस्कृतिक संदर्भातच अर्थ प्राप्त होतो.

साहित्य ही सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांवरील प्रतिक्रिया आहे. लेखकाची जडणघडण ज्या सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांच्या चौकटीत होते या मूल्यव्यवस्थेला कधी संवादी कधी विरोधी प्रतिक्रिया लेखक देत असतो. म्हणून साहित्य आणि संस्कृती याचा घनिष्ठ संबंध असतो.

संदर्भग्रंथ :

१. शं. दा. पेंडसे, महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास.
२. वि. पां. दांडेकर, महाराष्ट्र.
३. प्रा. द. वा. डिकसळकर, महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास.
४. प्रा. शेणोलीकर आणि प्रा. देशपांडे, महाराष्ट्र संस्कृती.
५. पु. ग. सहस्त्रबुद्धे, महाराष्ट्र संस्कृती.
६. पाध्ये दिगंबर - साहित्य, समाज आणि संस्कृती.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded